महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- १६ नोव्हेंबर, २०२१

## -: शुध्दीपत्रक :-

**विषय:-राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२१-परीक्षा शुल्काचा भरणा करण्यास मुदत देण्याबाबत**

संदर्भ:- (१) जाहिरात क्रमांक १०६/२०२१, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१
(२) दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे शुध्दीपत्रक

राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२१ करीता संदर्भीय शुध्दीपत्रकाद्वारे अर्ज सादर करण्यास व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा करण्यास दिनांक २ नोव्हेंबर, २०२१ रोजीपर्यंत व भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यास दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, काही उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा करुनही त्यांच्या खात्यामध्ये 'Fees Paid' असा शेरा दर्शवित नसल्याच्या तसेच शेवटच्या दिवशी चलनाद्वारे शुल्काचा भरणा करणा-या उमेदवारांचे परीक्षा शुल्क बँकेकडून स्वीकारले गेले नसल्याच्या तक्रारी आयोगास प्राप्त झाल्या आहेत.

२. प्रस्तुत तक्रारींच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाकडून पडताळणी केली असता, बरेचसे उमेदवार त्यांच्या बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला आहे की नाही, याची कोणतीही खातरजमा न करता पेमेंट गेटवेच्या पृष्ठावरुन व/अथवा खात्यातून थेट लॉग आऊट होतात. त्यामुळे त्यांच्या अर्जातील परीक्षा शुल्काची स्थिती अद्ययावत होत नाही व त्यांच्या बँक खात्यातून वजावट झालेली परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित बँकेकडून काही दिवसानंतर परत केली जाते. मुख्यत: भ्रमणध्वनीवरुन युपीआय (गुगल पे, फोन पे इत्यादी) द्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करणा-या उमेदवारांना अशी समस्या उद्भवत असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रस्तुत परीक्षेकरीता परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या व परीक्षा शुल्काचा भरणा करुनही त्यांच्या खात्यामध्ये 'Fees Paid' असा शेरा दर्शवित नसलेल्या उमेदवारांना **केवळ ऑनलाईन पध्दतीने** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची सुविधा दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी त्यांच्या खात्यात लॉगीन केल्यानंतर 'My Account' मेनूमधील राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२१ च्या अर्जाच्या तपशीलासमोरील 'Pay Now' या लिंकवरुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

४. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता SBI ePay व Quikwallet अशा दोन पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परीक्षा शुल्काचा भरणा करताना उमेदवारांनी पेमेंट गेटवेच्या पृष्ठावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला असल्याचा (Payment Successfull) संदेश दिसल्याशिवाय सदर पृष्ठ बंद करु नये तसेच खात्यातून लॉग आऊट होऊ नये. केवळ बँक खात्यातून रक्कम वजा झाली म्हणजे परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला व अर्ज स्वीकृत झाला, असे नाही. त्यामुळे उमेदवारांनी परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाल्याची स्वत: खात्री करावी. यासंदर्भात, आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील सूचना क्रमांक १.२.६.२ मधील तरतूदीचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

५. उमेदवारांच्या बँक खात्यातून रक्कम वजा होऊनही 'Fess Paid' असा शेरा दर्शवित नसलेल्या उमेदवारांच्या परीक्षा शुल्काची रक्कम आयोगास प्राप्त होत नाही व संबंधित बँकेकडून स्वयंचलित पध्दतीने वजा झालेल्या रकमेचा उमेदवारांच्या खात्यात परस्पर परतावा केला जातो.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.